University Grants Commission, New Delhi &
Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded Sponsored
**STATE LEVEL SEMINAR**
On

# CURRUPTION AND LOKPAL VIDHEYAK

Organised by
Department of Political Science

## Jaikranti Arts Senior College, Latur

(Affiliated to BCA, BBA, BCS, MCM College)

## Certificate

This is to certify that Prof. / Dr. Vishwanath Mahadev Avad

College Shankarrao Mohite Mahavidyalaya, Akluj

has participated as a Resource Person / Delegate and presented a paper On Lokpal vidheyakacha Itihas in the State Level seminar held on 28 & 29th July 2012 organised by the Department of Political Science Jaikranti Arts Sr. College, Latur (M.S.), in collaboration with University Grants Commission, New Delhi & Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.

**Prof. Chaudhari H.J.**
Co-ordinator
Organising Comittee

**Dr. Kusum Pawar**
Principal & Convenor

ISBN - 978-93-81190-71-5

# भ्रष्टाचार आणि लोकपाल विधेयक




मुख्य संपादक

**प्राचार्या डॉ. कुसुम पवार (मोरे)**

एम.ए.(राज्यशास्त्र,लोकप्रशासन), एम.फिल., पी.एच.डी.(राज्यशास्त्र)

# भ्रष्टाचार
# आणि
# लोकपाल विधेयक

■

मुख्य संपादक
**प्राचार्य डॉ. कुसूम पवार (मोरे)**

■

सहसंपादक
**प्रा. चौधरी हरिश्चंद्र जनार्दन**
**प्रा. जाधव श्रीधर शेषेराव**

---

अरुणा प्रकाशन,
लातूर

१०. लोकपाल विधेयकामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल काय?........................५४

**हर्षवर्धन संदिपान कोल्हापूरे**

११. लोकपाल विधेयकामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल ..................................६२

**प्रा.माने गणपत श्रीपतराव**

१२. लोकपाल विधेयकामुळे भ्रष्टाचार थांबेल काय ?

लोक पाल विधेयकाचा इतिहास :..................................................६६

**प्रा.विश्वनाथ महादेव आवड**

१३. भ्रष्टाचार आणि लोकपाल विधेयक...........................................७२

**प्रा.सौ.बोडके.पी.आर.**

१४. भ्रष्टाचार कमी करण्यास 'लोकपाल' काळाची गरज..................................७६

**प्रा.डॉ.डि.के.खोकल, प्रा. भालेराव सुधाकर नारायण**

१५. भ्रष्टाचार व लोकपाल विधेयक................................................८१

**प्रा. शोभा बाबुराव पाटील**

१६. लोकपाल विधेयकाची वाटचाल..................................................८५

**प्रा.सौ.रिता कदम (खोसे)**

१७. लोकपाल विधेयकामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल काय?..........................९०

**प्रा. चौकटे प्रकाश प्रल्हादराव**

१८. जन लोकपाल विधेयकाची प्रासंगिकता ..........................................९८

**प्रा.डॉ.कांतराव पोले**

७

# १२

# लोकपाल विधेयकामुळे भ्रष्टाचार थांबेल काय ?

## लोक पाल विधेयकाचा इतिहास :

प्रा.विश्वनाथ महादेव आवड
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
शंकरराव मोहिते महाविालय, अक्लूज ४१३१०१

लोक पाल विधेयक ाचा इतिहास जवळजवळ ४४ वर्षाचा आहे. लाल बहादूर शास्त्री पंतप्रधान असताना मोरारजी देसाई यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने लोक पाल संबधात शिफारस के ली. १९६८ मध्ये हे विधेयक संसदेत मांडले गेले. १९७० मध्ये ते बारगळले. क ारण क ॉग्रेस शिवाय इतर नेत्याचा विरोधात याचा वापर होईल त्याच प्रमाणे पंतप्रधान पदाला या तरतुदी लागू क रण्याबाबत मतभेद होते. १९७१ साली इंदिरा गांधी यांनी विधेयक संसदेत मांडले. १९७७ साली ते रद्द झाले. पण त्याच वर्षी नव्याने विधेयक मांडले गेले. त्यामध्ये पंतप्रधान पदाचा समावेश करण्यात आला. पण याबिलावरही मतभिन्नता होती आणि आणिबाणीचा प्रभाव यावर होता. राजीव गांधींनी १९८५ मध्ये हे विधेयक पुन्हा मांडले. पण बोफोसच्या गदारोळात हे विधेयक बारगळले. व्हि.पी सिंगानी नंतर प्रयत्न के ले. १९९६ मध्ये देवेगौडा यांनी विधेयक मांडले. पण ते सरक ार अल्पजिवी ठरले. भारतीय जनता पक्षाच्या क ाळात १९९८ व २००१ मध्ये २००४ मध्ये हे रद्द झाले. थोडक्यात दिसते की लोकपाल विधेयकावर आजतागायत अनेक वेळा चर्चा झाली पण लोकपाल विधेयकाला अंतिमस्वरूप मिळू शकले नाही.

लोकपालाबाबत सद्य परिस्थीती : लोकपाल विधेयकासाठी आण्णा हजारे व त्यांच्या सहकारी यांनी एक हुशारीने लोकपाल आंदोलनाला प्रसारमाध्यामांच्या सहाय्याने गांधीच्या सत्याग्रहाकडे खेचले आणि भारतातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी लोकपाला सारखी प्रभावी यंत्रणा असावी म्हणून एका मोठया आंदोलनाला सुरवात झाली. त्यावर संसदेत चर्चा ही झाली पण राज्यसभेत हे विधेयक मंजूर होवू शकले नाही.

**भ्रष्टाचाराची व्याख्या :**

कुणाच्या तरी कष्टातून तयार झालेल्या संपत्तीतील वाटा कष्ट न करता एखाद्या विभागाने घेणे किंवा सरकारी पायाभूत सेवा सुविधापासून उभे केलेल्या यंत्रणेचा फायदा खासगी विभागांना नफा वाढविण्यासाठी देत राहणे. भ्रष्टाचाराला अनेक कांगोरे आहेत पण भारतात केवळ लाचलुचपत आणि आर्थिक गैरव्यवहार यालाच भ्रष्टाचार म्हटले जाते. कोणतीही कर्तव्यच्युती आणि अनाधिकार हा ही भ्रष्टाचार समजला जातो.

**भ्रष्टाचाराबाबत सद्याचे कायदे :**

लाचलुचपत प्रतिबंधक कायदा प्रशासकीय कर्मचारी याबाबतचा कायदा सी. बि. आय. केंद्रिय दक्षता आयोग केंद्राचे व राज्याचे हिशोब तपासणारे कॅग याशिवाय उच्य न्यायालय व सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रशासन, अधिकारी यांचे विरोधात दाद मागता येते.

लोकपाल मंजूर होईल अथवा न होईल पण खरा प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे या विधेयकामुळे भ्रष्टाचार थांबेल का ?

लोकपालाने या देशातला सर्व भ्रष्टाचार थांबेल आणि भारत आण्णा हाजारेच्या राळेगळसिध्दी सारखा आदर्श ग्राम होईल असे स्वप्न प्रसारमाध्यमांनी रंगविलेले असले तरी वस्तुस्थिती खुप वेगळी आहे. कारण मुळात भारत म्हणजे काय हे माहित नसलेल्या मध्यमवर्गाने जस्ट चेंज म्हणून ज्या जनआंदोलनात सहभाग घेतला आणि या देशाला आता फक्त लोकपालच वाचवू शकतो असे वातावरण निर्माण केले. पण जनलोकपाल संमत झाल्यास त्याचा फायदा किती जणांना होईल हे माहित नाही आणि या देशातला भ्रष्टाचार संपेल का हा ही प्रश्न महत्वाचा आहे.

लोकपाल या विधेयकामुळे घटनात्मक प्रश्न निर्माण होतील :

१. लोकपाल या विधेयकाने काहि घटनात्मक पशन निर्माण होणार आहेत. लोकांचा कायदानिर्मीती प्रकियेत सहभाग हवा पण आम्ही म्हणतो तोच कायदा व्हावा हे संविधानाच्या विरोधी आहे कायदा करण्याचा अधिकार पर्डिल्ड्ढ संसदेला आहे. आपण दबाव गट निर्माण करून चर्चा संशोधन विचारविनीमय याआधारे त्यावर प्रभाव टाकू शकतो. पण कायदा प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घ्या हे लोकशाहीमध्ये बसत नाही. किंबहुना संविधानाची चौकट मोडित काढल्यासारखे होईल.

२. संविधानामध्ये नमुद केलेल्या मुलभूत अधिकारावर या विधेयकामुळे गदा येवू शकते.

संविधानाच्या कलम :
२०. १. मध्ये तरतूदी नुसार एखाद्या व्यक्तीने केलेले कृत्य कायद्यानुसार गुन्हा असेल तरच त्या व्यक्तीला दोषी मानून कायद्याच्या कार्यपध्दतीने शिक्षा दिली जाईल..
२०.२.एका गुन्हयासाठी एकच शिक्षा
२०.३.कोणत्याही व्यक्तीला स्वतः विरूध्द साक्ष देण्याची सक्ती केली जाणार नाही.

३. लोकपाल विधेयकाच्या अनुच्छेद ८ नुसार लोकपालाला जे अधिकार दिले जाणार आहेत ते घटनाविरोधी वाटतात कारण कार्यकारी व न्यायिक अधिकार लोकपाल या एकाच संस्थेकडे देण्याची तरतूद यामध्ये आहे. त्याचप्रमाणे लोकपाल निवडीची प्रकिया लोकशाही मुलतत्वांना आव्हान उभे करते.

४. लोकपाल विधेयकामध्ये आणखी एक मागणी आहे की कॅगच्या सर्व ठपक्यांची चौकशी लोकपालाने करावी पण हे अशक्य आहे. कारण दरवर्षी कॅग कडून चौकशी अंती अनेक ठपके ठेवले जातात. त्यातील बरेच तांत्रीक स्वरुपाचे असतात याचा विचार केलेला नाही.

५. लोकपालाला अधिकार देताना एक तरतूद अशी आहे की लोकपालाला शिक्षा देण्याचा अधिकार असेल पण त्याविरूध्द कोणत्याही न्यायालयात अपिल करता येणार नाही ही तरतूद घटना बाहय वाटते.

६. न्यायाधिशांच्या निवृत्तीनंतर सरकारकडून उपकृत होण्याच्या अपेक्षेने त्याच्या निष्पक्षतेवर परिणाम होईल.
प्रसिध्द विचारवंत मॉन्टेस्क्यू च्या मते लोकशाहीच्या विकास व यशस्वितेसाठी सत्ता विभाजन अतिशय महत्वाचे आहे. भारतीय संविधांनाने शासनाची सर्वोच्च सत्ता कायदेकारी, कार्यकारी व न्याय अशा एकमेकापासून स्वतंत्र तरी एकमेकावर अंकुश ठेऊन असणाऱ्या शासनांगाकडे सोपवली आहे. शासनाची हि तिन्ही अंगे सत्तासंतूलन टिकवून आहेत. लोकपालमध्ये मात्र या तिन्ही सत्ता स्वतःमध्ये सामाविण्याची इच्छा बाळगते. त्यामुळे जगभरामध्ये रूजलेल्या सत्ता संतुलन या तत्वाला हरताळ फासून धोका निर्माण होतो.

**लोकपाल हा काही चमत्कार घडविणारा नाही :**

लोकपाल म्हणजे तथस्थ यंत्रणा या देशात असावी असे म्हटले जाते. पण याआगोदर न्यायालयासारख्या तथस्थ यंत्रणा या देशामध्ये आहेत पण न्यायाधिश

भ्रष्टाचार मुळ आहेत असे दिसत नाही. त्याचप्रमाणे सिस्टिमेटिक भ्रष्टाचाराला आळा कसा घालणार. जर कायदेच असे बनविले की काही लोकांना फायदा होईल आणि काहींना नाही तर मग अशा कायद्याचे करायचे काय. याचे उत्तर आहे पण आणि नाही पण. समाजाच्या दबावातून आणि जरबेतुन आवाज निर्माण झाला तरच या तटस्थ यंत्रणेचा उपयोग होईल नाहीतर भ्रष्टाचार संपविण्याची कंत्राटे सामाजिक संघटनांना दिली जातील आणि नव्याने भ्रष्टाचाराला सुरवात होईल आणि प्रसारमाध्यमे त्याची संवग चर्चा करीत बसतील.

आपण लोकशाही व्यवस्थेत काम करीत आहोत. लोकशाहीची ताकद वाढण्यासाठी सर्व गोष्टींना आपला पाठिंबा हवा पण केवळ भ्रष्टाचाराचे निमित्त करून संसदीय लोकशाही ऐवजी व्यक्तीस्तोम माजवून व्यक्तीकेंद्रित अधिकार देणे या देशाला परवडणारे नाही.

कोणताही कायदा करताना प्रसिध्द विचारवंत लॉन एल फुल्लर आपल्या मॉरलिटी ऑफ लॉ या ग्रंथात अत्यंत महत्वाचे मार्गदर्शन केले आहे. फुल्लरनी जी ८ तत्वे सांगीतली आहेत त्या मुलतत्वानुसार लोकपाल विधेयकाचा मसुदा तपासल्यास या मसुद्याला शुध्द अनैतिकता याशिवाय कोणतेही नाव देता येणार नाही.

लोकपालमुळे भ्रष्टाचार रोखला जाईल काय हा महत्वाचा प्रश्न आहे तरी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की लोकपाल जादूची कांडी नाही. अमेरिका कॅनडा, ऑस्ट्रेलिया या प्रगत देशामध्ये जनप्रतिनीधी जनतेप्रति अधिक उत्तरदायी राहावेत आणि जनतेला भ्रष्टाचार होतो आहे असे वाटू नये म्हणुन विविध कायदे केलेले आहेत. १९७७ साली अमेरिकेत दि ऑर्गनायझेशन ॲक्ट, कॅनडामध्ये फायनान्शियल ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड कॉन्सिक्वेन्शिअल अमेन्डमेंट ॲक्ट २००३ साली व ऑस्ट्रेलियामध्ये अकौंटब्लिटी ॲण्ड रिफॉर्मस ॲक्ट १९९४ साली पारीत करणेत आले आहेत आणि यातील तरतुदींचे पालन येथिल लोकप्रतिनिधी करतात.

मात्र भारतात राज्यकर्त्यांचे मानसिक पोषण करणारे तत्वज्ञान भ्रष्टाचाराला नैतिक बैठक प्राप्त करून देत असल्यामुळे संवैधानिक नितिमत्तेचे पालन करण्यास येथिल राज्यकर्ते .प्रशासिकय अधिकारी कर्मचारी, न्यायाधिश, .तथाकथित समाजसेवक कमी पडतात.

**निष्कर्ष :**

लोकपाल विधेयकामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल का या प्रश्नाचे उत्तर तो पर्यंत होय म्हणून देता येत नाही की जो पर्यत ती संस्था किंवा व्यक्ती सामाजिक

व नैतिक अधिष्ठानाच्या पातळीवर काम करत नाही.

भारतातील भ्रष्टाचार कोणत्याही एका संस्थेच्या निर्मीतीमुळे थांबणार नाही मुळातच सामाजिकतेला नैतिक अधिष्ठान प्राप्त होत नाही तोपर्यंत तरी. फुल्लरच्या मते : Accountability lies in the heart of man when it dies there no constitution no low , no court can save it while it lies there is needs no constitution no low no court save it.

भ्रष्टाचाराचा प्रश्न हा भाबडेपणाने सुटेल असे मानता येत नाही. संसदेला ओव्हरटेक करण्याऐवजी किंवा संसदेला वळसा घालण्याऐवजी आगामी निवडणुकीत सहभागी होवून स्वच्छ चारित्र्याचे लोक संसदेत जातील याचा विचार केला पाहिजे. राजकीय प्रक्रियेबाबत लोकांमध्ये नफरत वाढू देणे या देशाला परवडणारे नाही. त्यातून विभुतीपूजक संरजामी भारताची वाटचाल हुकुमशाहीकडे होईल. ती लोकशाहीची मृत्यूघंटा असेल.

जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताकडे पाहिले जाते. ही संसदीय लोकशाही वर्षानुवर्षे अधिक परिपक्व होत आहे. या लोकशाहीने अनेक टोकाचे विचारप्रवाह सामवून घेतले आहेत. अनेक बदल स्विकारले आहेत. राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे या लोकशाहीचे अंशतः विकृत स्वरूप समोर आले आहे. ते नाकारण्याचा कोणताही हेतू नाही. भ्रष्टाचाराच्या प्रश्न महत्वाचा आहे, यात काही शंका नाही. पण संबंध व्यवस्थेची निरर्थकता आणि अविश्वास अधोरेखीत करणाऱ्यांना प्रश्न विचारावासा वाटतो. जर या व्यवस्थेत राम नाही तर मग इथे माहिती अधिकार कसा अस्तित्वात आला? लोकपाल नावाची यंत्रणा नसतानाही अशोक चव्हाण आणि येडीयुरप्पा यांना राजीनामा का द्यावा लागला? सिक्कीमचे माजी मुख्यमंत्री नर बहादुर भंडारी यांना तुरुंगाची हवा का खावी लागत आहे? कलमाडी आणि ए.राजा यांना जेलयात्रा का घडते आहे? न्या.सौमित्रसेन यांना महाभियोग का घडतो आहे? या दोषींवरील ही कारवाई विलंबाने झालेली असून ती पुरेशी नाही, हे न नाकारता वर उल्लेखलेल्या बाबी या व्यवस्थेतील सकारात्मक बाबींसाठीचा अवकाश अधोरेखीत करत नाहीत काय?

२००५-०६ साली झालेल्या एका सर्व्हेनुसार एकूण मध्यमवर्गाच्या ५६-६२% मध्यमवर्ग हा खाजगी उद्योगांवर, ग्लोबल फायनान्स इन्टेग्रिटीच्या २०१० च्या अहवालानुसार भारतातील एकूण भ्रष्टाचाराच्या ६८% भ्रष्टाचार हा १९९१ नंतरचा आहे आणि या भ्रष्टाचाराला या कॉर्पोरेट मध्यम वर्गाची साथ आहे तोच वर्ग आज

भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवितो आहे याच्याइतका मोठा विरोधाभास नाही.

आज जी माध्यमे नैतिकतेचा आव आणत लोकपाल विधेयकाला पाठींबा देत आहेत ती माध्यमे पेड न्यूजच्या वेळेस मूग गिळून गप्प का होती? ज्या जनलोकपाल बिलाच्या आंदोलनावर माध्यमांनी प्रकाशझोत टाकला तीच माध्यमे या बिलात खाजगी संस्थाही अंतर्भूत करायला हव्यात अशी सुचना केल्यास या विधेयकावर कवडसे तरी टाकतील की नाही याबाबत साशंकता आहे.

संदर्भ :


१. लोकपाल विधेयक व वास्तव : डॉ.जे.एफ .पाटील

२. दैनिक सामना

३. दैनिक सनातन प्रभात

४. दैनिक महाराष्ट्र टाईम्स

५. दैनिक प्रहार

६. http://sureshsawant.blogspot.in/२०११

७. Dr.Hari Narake यांचा लोकपाल संदर्भात लेख


***

